# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्सः२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक :- पीडब्ल्यूडी-४२१८/सीआर-२४/२०१८/तीन दिनांक :- २० नोव्हेंबर, २०१८

# घोषणा

**विषय:- निरीक्षक प्रमाणित शाळा व संस्था, गट-ब चाळणी परीक्षा -२०१८** करीता विकलांग उमेदवारांना परीक्षेच्या वेळी लेखनिकाची मदत व/किंवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय ठरविण्याबाबत.

आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता परीक्षेच्या वेळी उमेदवारांना लेखनिकाची मदत घेण्याची परवानगी आणि/अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय ठरविण्यासंबंधी आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक १ मार्च, २०१८ रोजी 'विकलांग उमेदवारांना लेखनिक पुरविण्याबाबत व अनुग्रह कालावधीबाबत मार्गदर्शक सूचना' उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांनुसार विहित नमुन्यामध्ये (प्रपत्र-१) आवश्यक सर्व कागदपत्रांसह अर्ज करुन आयोगाची पूर्व परवानगी घेतलेल्या उमेदवारांनाच परीक्षेच्या वेळी लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय राहील, असे आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणेद्वारे स्पष्ट करण्यात आले आले आहे.

**२.** आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ६ जुलै, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणेनुसार आयोगामार्फत आयोजित सर्व चाळणी परीक्षांकरीता लेखनिकाची मदत घेण्याची परवानगी आणि/अथवा अनुग्रह कालावधी घेण्याकरीता विकलांग उमेदवारांना लेखनिक पुरविण्याबाबत व अनुग्रह कालावधीबाबत मार्गदर्शक सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुन विहित नमुन्यामध्ये (प्रपत्र-१) आवश्यक सर्व कागदपत्रांसह अर्ज सादर करुन आयोगाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. तथापि, आयोगामार्फत रविवार, दिनांक २३ डिसेंबर, २०१८ रोजी आयोजित निरीक्षक प्रमाणित शाळा व संस्था, गट-ब चाळणी परीक्षा -२०१८ करीता अनेक विकलांग उमेदवारांनी लेखनिकाची मदत घेण्याची परवानगी आणि/अथवा अनुग्रह कालावधी घेण्याकरीता आयोगाकडे विहित नमुन्यामध्ये (प्रपत्र-१) लेखी अर्ज सादर करुन विनंती केलेली नाही. लेखनिकाची मदत घेण्याची परवानगी आणि/अथवा अनुग्रह कालावधीकरीता पात्र विकलांग उमेदवारांनी सदर जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करताना केलेल्या दाव्याव्यतिरिक्त आयोगाच्या उपरोक्त सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुन विहित नमुन्यामध्ये (प्रपत्र-१) आवश्यक सर्व कागदपत्रांसह **दिनांक १० डिसेंबर, २०१८ पर्यंत** लेखी विनंती करुन आयोगाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. अन्यथा, परीक्षेच्या वेळी लेखनिकाची मदत घेण्याची आणि/अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी देणे शक्य होणार नाही.

**३.** विहित नमुन्यामध्ये अर्ज सादर केलेल्या व आयोगामार्फत लेखनिकाची मदत घेण्याची आणि/अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी देण्यात आलेल्या उमेदवारांची नावे परीक्षेपूर्वी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. ज्या उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये अर्ज सादर करुनही त्यांचे नाव प्रस्तुत यादीमध्ये नमूद नसल्यास त्यांनी परीक्षेपूर्वीच आयोगाच्या कार्यालयाशी संपर्क साधणे आवश्यक राहील. याबाबत परीक्षेनंतर आलेल्या तक्रारींची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण:- मुंबई

उपसचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग